
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१ !

गोष्ट क्र. ११
१४ मार्च २०२१

## अरविंद परांजपे
(१९७३)



माझी नेतृत्वाची व्याख्या सांगायची तर, समाजात असलेली उणीव अथवा कमतरता याबद्दल स्वत:ला काहीतरी वाटणे आणि ती उणीव दूर करण्यासाठी स्वत:हून पुढे येणे म्हणजे नेतृत्व!

‘रूप पालटू देशाचे’ म्हणत असताना मला छोट्या– छोट्या गटापासून विचारपरिवर्तनाचे काम करावेसे वाटते. आपण जगात खूप गोष्टी बदलू शकत नाही, मात्र स्वत:ला नक्की बदलू शकतो. मोठे बदल करायचे असतील तर एकट्या माणसाने ते घडत नाहीत तर त्यासाठी संघटनेची गरज असते. असे छोट्या स्तरावर पण परिणामकारक काम करण्यात मला जास्त समाधान मिळते. समाजाच्या मनावर परिणाम घडवणाऱ्या सामाजिक संघटना उभ्या राहायला हव्यात आणि बळकट व्हायला हव्यात!



jpp51_51@jnanaprabodhini.org

गेले तीन महिने आमच्या वर्गातल्या (१९६९ मधली इ. ९वी प्रशालेची सुरुवात) मित्रांपैकी एकेक जण स्वत:ची गोष्ट सांगत आहे. **या मनोगत कथन मालिकेला मी 'मौलिक आणि मूलगामी' असे नाव दिले आहे. त्यानिमित्ताने आणि प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने माझ्या मुलाखतीच्या माध्यमातून अनेक आठवणी जाग्या झाल्या आणि मागे वळून बघता आले.** माझी स्मरणशक्ती राजीव बसर्गेकर एवढी नाही पण असे आठवते आहे की त्यावेळी आपण हुशार म्हणून निवडले गेलो तेव्हा कॉलर ताठ झाली होती.



**आम्ही वर्गमित्र**

१९६९-७० मध्ये आमची शाळा न्यू इंग्लिश स्कूलच्या इमारतीमध्ये सकाळी ७ ते १० आणि संध्याकाळी ७ ते ९ अशी दोन वेळा भरायची. दररोज ५.३० ते ७ 'मैदान' व्हायचे त्यालाच पुढे आपण दल म्हणू लागलो. त्यावेळी शरदराव सुंकर युवक विभाग प्रमुख होते. आमच्या वर्गात नंतर मागची तुकडी पण एकत्रित केली होती. मला आठवतंय आम्ही हिन्दी-इंग्लिश मिडियममध्ये त्यावेळी शिकत होतो. आप्पांनी त्यावेळी बाहेरचे चांगले शिक्षक हेरून त्यांना प्रबोधिनीत आणले होते. त्याचा खूप फायदा झाला. काही शिक्षक महाविद्यालयात शिकवत असत मात्र आप्पांच्या प्रेमाखातर ते आम्हाला शाळेत शिकवायला यायचे. ९वीमध्ये असताना आम्ही 'साहित्य प्राज्ञ' परीक्षेला बसलो होतो. आम्हाला मराठी शिकवायला अशोक निरफराके आणि विनय हर्डीकर होते, ज्यांनी आम्हाला मराठी साहित्याची लावलेली गोडी आजतागायत कायम आहे. राष्ट्रभाषा समितीतर्फे घेतल्या जाणाऱ्या 'हिन्दी कोविद' परीक्षेसाठी हिंदीचा भरपूर अभ्यास केलेला देखील आठवतोय. जलद वाचन आणि लेखनाची तेव्हा शिकलेली कौशल्ये नेहमीच उपयोगाला आली. १०वीमध्ये असताना आम्ही प्रबोधिनीच्या वास्तूमध्ये आलो. **युवक विभाग तेव्हापासून आमच्या हृदयाशी घर करून आहे तो आजपर्यंत !!** पालखीमध्ये आप्पांनी स्वत: शिकवलेले अभंग आणि त्यांच्या चाली अजूनही लक्षात आहेत.

## युवक विभाग – जडण-घडणीचे साधन

गणपतीच्या मिरवणुकीमध्ये आधी ढोल आणि मग ताशा वाजवला. एका दिवसात आम्ही तीन-तीन सुद्धा मिरवणुका करत असू. एक वेगळाच जोश आणि कैफ चढत असे. आण्णा त्यावेळी वाद्यपथकाचे प्रमुख असायचे आणि ताशेवाल्यांना नियंत्रणात ठेवत, हे लक्षात आहे. आंतरशालेय कबड्डीचे आम्ही विजेते होतो. मी पकड करण्यात निपुण होतो तर मोहन गुजराथी आक्रमण करण्यात. सामने बादफेरीनुसार चालायचे. रोज सकाळी सामना संपला की आप्पांच्या बरोबर परांडेवाड्यात आमचे रसपान ठरलेले असायचे. कबड्डी सोबत खो-खो, आट्यापाट्यामध्ये देखील खूप चुरस असायची. **युवक विभागातील सगळ्यांनी सगळे खेळ खेळले पाहिजेत हा आग्रह होता. मे महिन्यातील वासंतिक शिबिरात अनेक नवीन खेळांची ओळख झाली. अशाच एका शिबिरात थाळीफेक, गोळाफेक, उंचऊडी, लांब उडी, पोल व्हॉल्ट अशा अनेक प्रकारांची तोंडओळख झाली होती. त्यानंतर मी आणि मोहन गुजराथी, आम्ही दोघांनी प्रात्यक्षिकामध्ये पोल व्हॉल्ट प्रकारात आठ फुट उंचीवरून मारलेली उडी अजूनही लक्षात आहे.** आम्ही काही जण, विशेषत: मी आणि गजानन काळे (तो नंतर एनडीएत गेला ) बऱ्याचदा सिंगल volleyball खेळायचो. अशा सगळ्या खेळांच्या आवडीमुळे महाविद्यालयातही मी बास्केटबॉल संघात स्थान मिळवले.

मा. आप्पांच्या अनेक आठवणी आजही ताज्या आहेत. आप्पा स्वत: बासरी उत्तम वाजवत. संगीताचा देखील त्यांचा चांगला अभ्यास होता. प्रभावी आणि छाप पडणारे वक्तृत्व होते. ते परिस्थिती ज्ञानाचा तास घ्यायला आल्यानंतर विचारायचे, की आजच्या विषयावर जे बोलणार आहेत त्यांनी हात वर करून आपला क्रमांक सांगा. नंतर ते सहा नावं क्रमांकासह फळ्यावर लिहायचे आणि आमच्याकडून विषय मांडून घ्यायचे.

**शाळेपासूनच सर्व गोष्टींमध्ये 'स्वावलंबन' असावे हीच शिकवण आम्हाला मिळाली.** स्वत:ची वास्तू नसल्याने वर्षारंभ - वर्षांताचे कार्यक्रम बाहेरच्या ठिकाणी व्हायचे आणि आम्ही तिथे जाऊन स्टेज, लाईट, माईक, वायरिंग अशी संपूर्ण तयारी स्वत: करायचो. अशाच एका कार्यक्रमाची तयारी करताना शरदराव सुकरांनी वीज जोडणी शिकवली होती. न कळत कित्येक गोष्टी आमच्या हातून घडून जायच्या आणि आता नंतर लक्षात येते आहे की त्याचा आपल्याला कसा फायदा झाला. **स्वत: गोष्टी**

**करून पाहण्यात प्रबोधिनीमध्ये भर असतो. शिवाय युवक विभागातल्या कार्यकर्त्यांकडून अनेक गोष्टी शिकलो.** मला आठवतंय की त्यावेळी विसूभाऊ गुर्जर (handstand करत) हातावर चालत जायचे आणि योगासनामधली नौली क्रिया ही करायचे. युवक विभागाचे काम करतानाही १२-१२ तास अभ्यास करून शिक्षणात देखील हे कार्यकर्ते अव्वल क्रमांकावर असायचे.

आमच्या वेळेपासून पथक पद्धतीची सुरुवात झाली. मी स्वामी विवेकानंद पथकाचा प्रमुख होतो. त्यावेळी अविनाश धर्माधिकारी माझ्या पथकात होता, हे लक्षात राहिले आहे. अनेक उपक्रमांचे आयोजन करत नेतृत्त्व कसे करायाचे ते शिकलो. **एका तीन दिवसीय सहलीकरता कुठे जायचे आहे हे संगितले नव्हते. सारसबागेच्या गणपती मंदिरात चिठ्ठी ठेवलेली होती आणि ती वाचून पुढे आम्ही शिवापूरला गेलो. पथकप्रमुख म्हणून असे कितीतरी अनुभव मला मिळाले. चार पथकांच्या वेगवेगळ्या रंगांच्या गणवेशाकरिता कापड आणून सगळ्यांच्या मापानुसार त्या शिंप्याकडून शिवून घेऊन वाटपाचे काम प्रमुख या नात्याने मी पूर्ण केले होते. मे महिन्यातील एका शिबिरात ४० मुलांसाठी मी पिठलं बनवले होते. त्यानंतरही आता पक्वान्नासह अनेक पदार्थ मी करत असतो. ११वी ला असताना पालखीच्या दिवशी एका कार्यकर्त्याने मला स्कूटरमध्ये पेट्रोल भरून आणायला सांगितले होते. मी हो म्हणून प्रबोधिनीमधून लक्ष्मीरोडवरच्या पंपावर मला आधीचा काहीही सराव नसताना पहिल्यांदाच (गियर असलेली) स्कूटर घेऊन गेलो. ह्या सर्वांतून माझ्यातला 'कार्यकर्ता' घडत गेला आणि मानसिक ताकद वाढत गेली असे आज जाणवते. 'कुठल्याही कामाला नाही म्हणायचे नाही' हे आम्ही प्रत्यक्ष बघून शिकत होतो. असे धडे पुस्तकात वाचून शिकता येत नाहीत.** निवासी वासंतिक शिबिरे, दोन गटातील युद्ध, रात्रीचा पहारा, 'रणी फडकती 'सारखी पद्ये, हे सगळं अजून आठवतं. आप्पांनी घेतलेल्या समाजवाद, साम्यवाद आणि हिंदुत्ववाद अभ्यास शिबिरांमुळे आमची वैचारिक जडण-घडण झाली. त्यातून मला अनेक मोठ्या लोकांची भाषणे ऐकायची आणि अभ्यास करायची आवड लागली. अटलबिहारी वाजपेयी, नानी पालखीवाला, जगन्नाथराव जोशी, पु. ल. देशपांडे, मोहन धारिया अशा सगळ्यांची भाषणे आम्ही आवर्जून ऐकली.

शाळेकरिता आठवी पर्यन्त मी रोज तळेगावहून पुण्याला लोकलने जाऊन येऊन करत असे. ९वी नंतर प्रशाला दुबार असल्याने हे शक्य नसल्याने मी पुण्यात नातेवाईकांकडे रहात होतो. **१२वीच्या परिक्षेपूर्वी दोन महिने मी वास्तूतच येऊन राहिलो होतो. तेव्हा आण्णा देखील तिथे राहात असत. रोज सकाळी उठून स्वच्छतागृह साफ करायची सवय त्यांनी आम्हाला लावली. या सगळ्या छोट्या वाटणाऱ्या पण अतिशय महत्त्वाच्या गोष्टी आहेत. असे दिसते की पोशाखी लोकांना कामं करायची लाज वाटल्याने हे काम माझं नाही असं म्हणून आपले नुकसान करून घेतात. आमच्यावर मात्र त्याकाळी आपसूकच या सगळ्यातून 'कुठलेही काम छोटे नाही', 'नाही म्हणायचे नाही' असे संस्कार होत गेले.** प्रशाळेत सगळे उपक्रम मी आवडीने करत असताना तेव्हा आणि नंतरही अभ्यासात मात्र मी साधारण विद्यार्थी होतो. महाविद्यालयात असताना नाटक, बास्केटबॉल यात मी भाग घेतला होता. तेव्हा युवक विभागाचे देखील काही प्रमाणात मी काम करत होतो.

### पदवी आणि नंतर

१९७६ मध्ये मी BSc झालो पण संशोधन/प्राध्यापकी करण्याची इच्छा नसल्याने मी application based field side निवडून Cost and Management Accountant (CMA) झालो. ते करत असताना दोन वर्ष SBI मध्ये नोकरी करून फिनोलेक्स आणि नंतर फिलिप्समध्ये १९८३ ते ९० या काळात मॅनेजर म्हणून नोकरी केली. त्यामुळे अनेक ठिकाणी काम करत अगदी प्रोप्रायटर पासून ते आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये मॅनेजर पदापर्यंत विविध जबाबदाऱ्या हाताळल्या. फिलिप्समध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कॉस्ट अकाऊंटस् सिस्टीममध्ये काम करायला मिळाले. जगभर विस्तारलेल्या या कंपनीमध्ये आर्थिक कामकाजाच्या आदर्श पद्धतींचा चांगला अनुभव मिळाला. १९८४ मध्ये फिलिप्समध्ये पहिला वैयक्तिक संगणक आला तेव्हाच मला सॉफ्टवेअरमध्ये देखील रस निर्माण झाला होता.

### कॉस्ट मॅनेजमेंट सल्लागार

आधी स्टेट बँक मग फिलिप्स अशा चांगल्या-चांगल्या नोकऱ्या सोडल्याने त्यावेळी लोक मला हसायचे देखील. पण मला पुढे वेगवेगळ्या दिशा दिसत होत्या आणि स्वत:चा व्यवसाय करायचा हे पहिल्या दिवसापासून नक्की होते! १९९० मध्ये मी फिलिप्स सोडल्यानंतर लघू/मध्यम उद्योगांकरता २००३ पर्यन्त मी कॉस्ट व मॅनेजमेंट अकौंटिंग आणि कंपनी सेक्रेटरियल सेवा यात काम केले. बहुराष्ट्रीय कंपनीतला मोलाचा अनुभव मिळाल्यानंतर मी लघुउद्योगांसाठी cost control, cost management, cost reduction अशा क्षेत्रात सल्ला द्यायला सुरुवात केली. त्याबरोबरीने संगणकावरच्या सिस्टिम डेव्हलपमेंटचे कामदेखील मी काही

वर्षं केले. त्यात फिलिप्सकरता time office चे automation आणि applications प्रोग्रॅमरची मदत घेऊन तयार केले. User interface आणि development असा बराचसा भाग मी पहायचो. याशिवाय लघु उद्योगाकरता मी costing and inventory system develop केली. मी स्वत:ची प्रॅक्टीस आणि शिकवणे असे सुरू करायचे ठरवले.

१९८६ मध्ये मी CS (कंपनी सेक्रेटरी) झालो होतो. **१९९२ मध्ये आपल्या देशात आर्थिक उदारीकरण सुरू होऊन 'सेबी'ची स्थापना झाली. भांडवल विक्रीची अनेक बंधने उठवली गेली. त्यानंतर मी कॅपिटल मार्केट, शेअर्स विक्री आणि भांडवल उभारणीमध्ये अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. पब्लिक इश्यू, परदेशी अर्थसंस्थांना प्रायव्हेट प्लेसमेंट, राईट्स इश्यू, ओटीसी एक्स्चेंज इश्यू, अर्थसंस्थांकडून मुदत कर्ज मंजूरी अशी सर्व कामे करणारा बहुधा मी एकमेव कंपनी सेक्रेटरी असेन! पुढे मी एम्‌बीएला आणि कॉस्ट अकाऊंटंटच्या पुणे शाखेत पाहुणा व्याख्याता म्हणून शिकवायला लागलो. मराठा चेंबर, सीआयआय यांच्याकरिता अर्थव्यवस्थापनाच्या कार्यशाळाही घेतल्या.**


### अर्थसल्लागार





२००३ पासून मी सध्या करत असलेले म्युच्युअल फंड आणि वैयक्तिक अर्थ सल्लागार म्हणून काम सुरू केले. 'सुशिक्षित गुंतवणूकदार – सुरक्षित गुंतवणूकदार या भूमिकेतून अनेक व्याख्याने दिली. आकाशवाणीवर आर्थिक विषयांवर नाटिका सादर केल्या. इतकेच काय पण माझ्या कीर्तनकार बहिणीकडून आर्थिक विषयासंबंधीची जागरूकता निर्माण करण्याकरता 'अर्थकीर्तन' ही आयोजित केले. शिवाय फेसबुक आणि यू ट्यूब वरून आर्थिक विषयांवर जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो आहे. २०१६ नंतर मी माझी अर्थ सल्लागार आणि म्युच्युअल फंड वितरण करणारी कंपनी सुरू केली आहे आणि याद्वारे १५०० पेक्षा अधिक गुंतवणूकदारांना अर्थसल्ला सेवा देत आहोत.

### माझे लेखन

१९९२ पासून मी सकाळ, अर्थमंथन साप्ताहिक, व्यापारी मित्र, संपदा, यात गुंतवणूक, अर्थव्यवस्था आणि अर्थव्यवस्थापन यावर लेख लिहायला सुरुवात केली. आजपर्यंत एकूण ५०० पेक्षाही जास्त लेख छापले गेले आहेत. **माझ्या लहानपणी तळेगावला गो. नी. दांडेकर आमच्या घराजवळ राहायचे. मी त्यांच्यासोबत अनेक किल्ल्यांवर फिरलो आहे. त्यांचे साहित्य छापून आले की ते पहिली प्रत माझ्या वडिलांना भेट द्यायचे. त्यांची सहज भाषा मला अतिशय आवडायची. त्यांच्या सहवासात निर्माण झालेली साहित्याची आवड प्रबोधिनीमध्ये पुढे वृद्धिंगत झाली.** २००९ मध्ये प्रसिद्ध झालेले माझे पहिले पुस्तक **'धनवृद्धीसाठी म्युच्युअल फंड'** हे मी विषयाचा रुक्षपणा कमी करण्यासाठी संवाद स्वरूपात लिहिले आहे. अनेकांना किचकट वाटणारा आर्थिक विषय गोष्टीरूपाने सोपा करून सांगण्याचा हा प्रयत्न यशस्वी ठरला आणि **सकाळ प्रकाशनाने काढलेल्या पुस्तकाच्या दहा हजार पेक्षा अधिक प्रतींची विक्री झाली आहे.** तसेच माझे इंग्रजी पुस्तक **Prosperity through Mutual Funds** हे ऑनलाइन पद्धतीने संपूर्ण देशात म्हणजे काश्मीर ते कन्याकुमारी आणि गुजरात ते आसाम विकले जात आहे. माझे तिसरे पुस्तक, **'मंत्र गुंतवणुकीचा'** या राजहंस प्रकाशनाने काढलेल्या पुस्तकाची पहिली आवृत्ती संपून दुसरी आवृत्ती निघत आहे.




'धनवृद्धीसाठी म्युच्युअल' फंड पुस्तक प्रकाशन: संतोष शेणई, हस्ते दीपक घैसास, सीमा परांजपे



'मंत्र गुंतवणुकीचा' पुस्तक प्रकाशन – सीमा परांजपे, यमाजी मालकर, अनिल बोकील, डॉ. सदानंद बोरसे


## माझे अन्य उपक्रम

मला असं वाटतं की नेतृत्वाची सुरुवात आपण इतरांसाठी काहीतरी करावं असं वाटण्यापासून सुरू होते! माझी नेतृत्वाची व्याख्या सांगायची तर, समाजात असलेली उणीव अथवा कमतरता याबद्दल स्वतःला काहीतरी वाटणे आणि ती उणीव दूर करण्यासाठी स्वतःहून पुढे येणे म्हणजे नेतृत्व! सुरुवातीला आपल्या कुटुंबातील समस्या सोडवायला कुटुंबातील सदस्यांना एकत्र करायला लागते. नंतर आपण ज्या परिसरात राहतो त्या परिसरासाठी इतरांचे सहकार्य घेत त्यावर काम करता येते. असे एक-एक पायरी चढत आपण देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहोचू शकतो! **'सेव्हन हॅबिट्स ऑफ हायली इफेक्टिव्ह पीपल'** या **स्टीफन कवी (Stephen Covey)** या जगप्रसिद्ध व्यवस्थापन गुरूंच्या पुस्तकाचा माझ्यावर प्रभाव पडला आहे. 'तुमच्यात नेता आणि व्यवस्थापक या दोघांचेही गुण असले पाहिजेत', हा या पुस्तकातील मुद्दा मला खूप भावला. आपण फक्त कार्यक्षम न राहता परिणामकारकही असले पाहिजे आणि त्या करता आवश्यक त्या सवयी आपल्यामध्ये कशा बाणवायच्या या विषयावर मी लेख लिहितो आणि कार्यशाळा देखील घेत असतो. त्याबरोबरीने **अशोकराव निरफराके यांनी संशोधन करून लिहिलेले 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' या पुस्तकावर आधारित 'कल्पकता विकासाकरिता' कार्यशाळाही घेतो.** सध्या लॉकडाउन असताना मी झूमच्या माध्यमातून 'परिणामकारकता आणि कल्पकता कशी वाढवावी', 'मानसिक आणि शारीरिक आरोग्य संवर्धन', अशा विविध विषयांवर अनेक सत्रे घेतली/आयोजित केली होती. 'मला हे सर्व माहिती आहे' अशी माझी भूमिका नाही तर इतरांना सांगितले की आपल्यालाच असे विषय अधिक चांगले कळायला लागतात या स्वार्थी हेतूने हे मी करतो. माझा अनुभव असा आहे, की लोकांशी संवाद साधल्याने आपले ज्ञान वाढत राहते आणि पक्के होत राहते. **मी मोठ्या गटाचे नेतृत्व न करता माझे लक्ष छोट्या गटावर ठेवले आणि त्यांचे अधिमित्रत्व मी स्वीकारतो. (मेन्टॉरिंग). सीएमए करणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि सीएमए व्यावसायिकांची प्रशिक्षणा अभावी जडण-घडण नीट होत नाही हे जाणवल्यावर मी माझ्या क्षेत्रातील ३-४ जणांना एकत्र घेऊन पुणे शाखेमध्ये 'मॅनेजमेंट अकाऊंटंटस् स्टडी सर्कल'ची स्थापना केली होती. त्याद्वारे पाच वर्षं आम्ही प्रत्येक महिन्यात cost management सह गुणवत्ता सुधारणा, पर्यावरणाचे मॅनेजमेंट अकौंटिंग, उत्पादन व पणन व्यवस्थापन, संगणक तंत्रज्ञान या क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींशी व्याख्याने आणि चर्चासत्रे यांचे आयोजन केले.** Every resource has a cost. त्यामुळे कुठलाही विषय असला तरी cost management या विषयाशी तो निगडित असल्याने का आणि कसे? असे प्रश्न विचारणे , म्हणजे cost management चा सखोल अभ्यास' असा चांगला उपक्रम आम्ही सुरू केला होता. कलेची आवड असल्याने मी कंपनी सेक्रेटरीच्या पुणे शाखेत सभासदांच्या कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी 'सीएस् कलामंडळ' सुरू केले होते. तिथे सभासदांचे गायन, वादन, चित्र, शिल्प, रांगोळी, कविता, वक्तृत्व अशा गुणांना उत्तेजन मिळेल असे कार्यक्रम घडवून आणले.

**'दाबके ट्रस्ट' या सार्वजनिक न्यासाचा मी स्थापनेपासून (१९९७) पासून विश्वस्त आहे.** ट्रस्टचे संस्थापक दिवंगत झाल्यानंतर त्यांनी मृत्यूपत्रातून ट्रस्टला दिलेल्या आर्थिक निधीच्या हस्तांतरणात अनेक अडचणी आल्या. यातून मी माझ्या सीएस च्या ज्ञानाचा उपयोग करून मार्ग काढू शकलो आणि नंतर माझ्या म्युच्युयल फंडातील अनुभवाचा फायदा घेऊन ट्रस्टचा आर्थिक पायाही मजबूत करू शकलो. **गेली पाच वर्षे 'शिक्षण, पर्यावरण, कला आणि आरोग्य' अशा चार उद्दिष्टांवर आम्ही या ट्रस्टच्या माध्यमातून काम करतो आहोत. त्याद्वारे अनेक संस्था आणि व्यक्तींना आर्थिक मदत करताना केवळ मानवतेच्या दृष्टीकोनातून निवड न करता ज्यामधून रचनात्मक, नाविन्यपूर्ण आणि संशोधनात्मक कार्य होईल अशा प्रकल्पांची निवड करतो.** उदा. शिक्षकांचे प्रशिक्षण, नेतृत्त्व संवर्धन, नवीन कलाकारांना प्रोत्साहन इत्यादी. प्रबोधिनीच्याही वेगवेगळ्या उपक्रमांना ट्रस्ट तर्फे मदत केली जाते. 'गानवर्धन' या अभिजात संगीताचा प्रसार करणाऱ्या संस्थेचा विश्वस्त आणि आर्थिक सल्लागार असेही काम मी सध्या करतो आहे.

## कलेचा वारसा

आम्हा तिघा भावंडांवर घरातूनच कलेचे संस्कार झाले. माझे वडील डॉक्टर होते आणि चांगले नाट्यदिग्दर्शकही होते. ६० वर्षापूर्वी तळेगाव हा अगदीच ग्रामीण भाग होता. पण तिथे ते शाळांच्या मदतीसाठी नाटकं करायचे. आईसुद्धा डॉक्टर होती आणि भजनी मंडळ आणि महिला मंडळ या माध्यमातून तेथील गरीब आणि अशिक्षित स्त्रियांमध्ये काम करायची. माझे मामा संगीतकार आणि गायक होते, ज्यांनी मला पहिल्यांदा तबला शिकवला. **नंतर पं. जी एल् सामंत आणि पं. सुरेश तळवलकर**



**'तब भी बोला' सादर करताना**

**यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांचे ज्येष्ठ शिष्य आणि आपले माजी विद्यार्थी रामदास पळसुले याच्याकडूनही मी धडे गिरवत असतो. नंतर तबल्याची साथसंगत आणि एकल वादनाचे कार्यक्रम मी भारतात आणि ऑस्ट्रेलिया (४ वेळा), इंग्लंड, दुबई, सिंगापूर येथे सादर केले आहेत. तबला या सर्वात प्रगल्भ तालवाद्याची सप्रयोग ओळख करून देणारा 'तब भी बोला' हा माझा विशेष कार्यक्रम मी देश–विदेशांत ३५ हून अधिक ठिकाणी केला आहे.** सध्या मी ऑनलाइन पद्धतीने परदेशातील विद्यार्थ्यांना तबला शिकवतोय.

आम्ही तिघे भावंडे आजही कला क्षेत्रात आहोत. मोठे भाऊ डॉक्टर अनंत हे माझ्या वडिलांनी सुरू केलेल्या तळेगाव येथील 'कलापिनी' या संस्थेचे प्रमुख म्हणून अनेक वर्षं काम बघत आहेत. तेथेही नाट्यसंकुल उभारण्याकरिता मी काही वर्षे काम करतो आहे. माझी बहीण अंजली कऱ्हाडकर ही नाट्यकर्मी आणि कीर्तनकार आहे. या सर्वांच्या मदतीने मी अभिजात संगीताच्या प्रसाराकरता 'स्वर कमलांजली' या नावाने माझे मामा पंडित कमलाकर जोशी रचित बंदिशींचे 'गायन–वादन–नृत्य' या तिन्ही माध्यमातून सादरीकरणाचे कार्यक्रम करतो. याचे संयोजन करण्या बरोबरीने तबला साथही मी करतो. अभिजात संगीतातल्या बुजुर्ग आणि ज्ञानी व्यक्तींचा संगीत विचार रसिकांपर्यंत पोचवण्याकरिता गेली १० वर्षे 'संगीत संवाद' या कार्यक्रमाचे मी आयोजन करतो आहे. या दहा मुलाखती आता पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याचे कामही चालू केले आहे.

### वन्यजीव छायाचित्रण

माझा अजून एक छंद म्हणजे आपल्या देशातील प्राणी व पक्ष्यांचे छायाचित्रण. गेली चार वर्षे मी काढलेल्या विविधरंगी पक्ष्यांच्या फोटोंचे टेबल कॅलेंडर माझ्या गुंतवणूकदारांना वितरित करतो आहे. याची सुरेख छपाई माझा वर्ग मित्र प्रफुल्ल कुलकर्णी प्रबोध उद्योगातर्फे करून देत असतो. सर्वच वयोगटाच्या लोकांमध्ये निसर्ग आणि पक्षी यांच्याविषयी जागरूकता निर्माण होऊन त्यांच्या कुतूहल वाढीला हे टेबल कॅलेंडर साह्यभूत होते आहे असा अनुभव आहे. तसेच फेसबुक व स्लाईड शो यांच्या माध्यमातूनही या बहूरंगी प्राण्यांचे आणि पक्ष्यांचे फोटो शेकडो जणांपर्यंत पोचतात व त्यांना आपल्या देशाच्या समृद्ध जैव विविधतेचे ज्ञान होते आणि त्यांचे निसर्गप्रेम वाढीला लागते.



**पक्षीजगताची झलक (झोळीवाला, नीलपंखी, वेडा राघु, सुगरण)**

### छोट्या स्तरावरचे प्रभावशाली काम

माझ्या ह्या सगळ्या प्रवासात माझ्या आई–वडिलांपासून अनेक गुरुतुल्य व्यक्तींचे ऋण व्यक्त करावेसे वाटतात. माझे वडील तर संघाच्या मुशीत घडलेले समाजसेवी डॉक्टर होते. अनेकदा ते पेशंटच्या घरी जाऊन त्याच्या घरात स्वत: स्टोव्ह पेटवून काचेची सिरींज उकळून इंजेक्शन द्यायचे. पेशंटकडे पैसे नसतील तर स्वत:च्या पैशाने ते आणायचे. असे संस्कार पालकांनी आमच्यावर केले. माझे मावसे कै. प्रभाकर कोल्हटकर हे मा. आप्पांचे संघामधील मित्र होते. त्यांच्याशी केलेल्या अनेक विषयांवरच्या चर्चांमधून माझी विचारक्षमता वाढली आहे. वकील असलेले माझे मोठे काका पु.वा. परांजपे, तळेगावचे नगराध्यक्षही होते. भीती न बाळगता योग्य आणि आपल्याला आवडेल ते करावं हे मी त्यांच्याकडे पाहून शिकलो. वेळ पाळणे आणि शिस्त याबाबत मी माझे सासरे, दादा करमरकर यांच्याकडून शिकलो. **व्यक्ती मोठी असो किंवा छोटी, डोळसपणे बघितले तर आपल्याला भेटणाऱ्या प्रत्येकाकडून काहीतरी शिकता येते.**


**'We Indians lack only by character' हे नानी पालखीवाला यांचे वक्तव्य खूपदा विचार करायला भाग पाडते. आप्पा देखील नेहमी म्हणायचे, चारित्र्य असणारे २०० नेते आम्हाला राष्ट्राला द्यायचे आहेत! मला असे वाटते की चारित्र्यवान समाज निर्माण करायला अजून अनेक वर्षे लागतील.** अर्थसाक्षरता हा त्यातील अगदीच छोटासा भाग आहे जो वाढवायचा मी अनेक वर्षे वेग वेगळ्या मार्गाने प्रयत्न करतो आहे. **माझ्या नजरेतून 'रूप पालटू देशाचे' म्हणजे काय? तर माझ्यापासून सुरुवात करून सभोवतालच्या व्यक्तींसह छोट्या गटाचे विचारपरिवर्तनाचे काम करण्याचा प्रयत्न करत राहणे. असे करण्यातच मला समाधान मिळते.** उदा : छात्र प्रबोधन मासिकाच्या दिवाळी अंकाला आर्थिक प्रायोजक मिळवून

देण्याचे काम मी अनेक वर्षे करतो आहे. त्यामुळे **जगातील गोष्टी बदलून टाकू असे न म्हणता आपल्याला जमू शकेल असा बदल घडवण्याचा प्रयत्न करतो. अर्थातच समाजात बदल करायचे असतील तर एकट्या माणसाला ते घडवता येत नाहीत, तर त्यासाठी मोठ्या संघटनेची गरज असतेच. त्याकरिता समाजमनावर परिणाम घडवणाऱ्या सामाजिक संघटना बळकट व्हायला हव्यात! छोट्या स्तरावर पण प्रभावशाली काम करण्यात मला जास्त समाधान मिळते.**

अनुभव शिक्षण हा प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीमधील महत्त्वाचा घटक आहे. जबाबदारी घेऊन काम करण्याचा अनुभव इतरत्र कमी मिळतो. दलावर दादा म्हणून जबाबदारी घेतल्यावर तुम्ही जे शिकता ते बाहेर शिकता येत नाही. अशा अनेक चांगल्या गोष्टी सांगता येतील. एक सुचवायला आवडेल की असे घडलेले आपले अनेक माजी विद्यार्थी आहेत त्यांचा सध्याच्या प्रशालेतील विद्यार्थ्यांशी आणि कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवायला हवा. त्यांच्या अनुभवाचा फायदा नक्की या सर्वांना करून देता येईल. या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा फायदा घेऊन (प्रशाला + प्रबोधिनीचे विभाग) आणि माजी विद्यार्थी असा थेट संपर्काचा सेतू नक्की तयार व्हायला हवा! अनेक माजी विद्यार्थी त्यासाठी तयार आहेत. प्रबोधिनीच्या व्यवस्थापनाने आपली गरज ओळखून माजी विद्यार्थी काय करू शकतात याची सांगड घातली पाहिजे. काहींच्या मते **ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या विद्यार्थ्यांचा एक 'वेगळा' गट बनला आहे. तसा आपला वेगळेपणा दिसणारच आहे. पण त्याचा एक 'कल्ट' न होऊ देता सर्व समावेशक उद्दिष्टांसाठी चाललेले हे आपले काम असेच चालू राहायला हवे.** माझा मुलगा पुष्कर हा सुद्धा प्रशालेत शिकला असल्याने त्याचेही मत मी जाणून घेतले. त्याला असे वाटते की प्रशालेत अनेक गोष्टींचे थोडे-थोडे शिक्षण देण्याबरोबरीने निवडक गोष्टींवर अधिक भर देऊन त्यांचे सखोल प्रशिक्षण सुरू करता येईल का, यावर विचार व्हावा. सगळ्यांना सर्व गोष्टी अनिवार्य केल्याने काहींची मने दुखावली जातात असे त्याचे निरीक्षण आहे. त्यामुळे आपला उद्देश साधला जातो का? या प्रश्नांचा अभ्यास व्हावा असे वाटते. भारतात कितीतरी सेवाभावी संस्था कित्येक वर्षे कार्यरत आहेत. त्यांच्या कामामुळे समाजात अपेक्षित बदल घडला आहे का? जर नसेल तर त्याची कारणे काय आणि असा बदल कशामुळे पडू शकेल? असा आढावा जरूर घ्यावा. आपण मोठी स्वप्ने जरूर पाहावीत आणि ती साकार करण्याचे प्रयत्नही करू या. पण तसे करताना, छोट्या पातळीवरून एकदम देशपातळीवर जाण्याचा अट्टाहास करतोय का याचाही विचार करावा.




**४० किमी सायकलिंग**



**पुष्कर – @XIMB, Bhubaneshwar**



**अर्थसंवाद: (मी लिहिलेला)– अंजली कऱ्हाडकर, डॉ अनंत परांजपे, सीमा परांजपे, सचिन जोगळेकर**



**कल्पकतेची कार्यशाळा**
**(डावीकडून : पुष्कर परांजपे, सीमा परांजपे)**

## Rapid Fire

१. **आवडता चित्रपट** – सध्या मी सिनेमे पाहत नाही. शेवटचा पाहिलेला सुधीर फडकेंचा 'वीर सावरकर' मला आठवतोय.

२. **आवडते पुस्तक –** 'आवर्तन'.. माझ्या गुरूंचे, पंडित सुरेश तळवलकरांनी लिहिलेले.

३. **आवडता अर्थतज्ज्ञ** – नानी पालखीवाला. ते वकील होतेच, पण अर्थतज्ज्ञही होते.

४. **पहिली प्रतिक्रिया**

- **तबला** – 'आप ने हमे हमारे लखनौ के तबले की याद दिलायी!' अशी पावती मला ऑस्ट्रेलिया मधील कार्यक्रमात एका प्रेक्षकाने दिली. आणि सिप्ला सेंटर मधील कॅन्सरच्या शेवटच्या टप्प्यात असणाऱ्या पेशंटनी वाजवलेल्या टाळ्या!
- **पैसा –** 'पैशावर मिळवा पैसा' असे माझे व्यवसायातील ब्रीदवाक्य आहे! पण तुकाराम महाराजांचे 'उदास विचारे वेच करी' हे खरे!
- **पक्षी –** पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र व्हा आणि भरारी घ्या!
- **पंडित सुरेश तळवळकर** – संगीतामधील सर्वज्ञात असणारी व्यक्ती
- **अधिमित्र –** प्रत्येकाला एक किंवा अधिक अधिमित्र असायला हवेत आणि तुम्ही सुद्धा इतरांचे अधिमित्र व्हायला हवे (मेंटर)
- **ज्ञान प्रबोधिनी** – 'आयुष्य घडवणारी अविस्मरणीय संस्था!'
- **आप्पा पेंडसे** – 'आपल्याला अशक्य काही नाही!' असा विश्वास देणारी व्यक्ती

५. जर पुन्हा नव्याने आयुष्य जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल/कोणत्या क्षेत्रात काम करायला आवडेल? (आत्ताच्या क्षेत्राव्यतिरिक्त)

- आवडीच्या अनेक क्षेत्रात मुसाफिरी करून झाली असल्याने एकाची निवड करणे अवघड आहे. पण पूर्णवेळ खेळाडू किंवा संगीतकार व्हायला आवडेल.

**अरविंद परांजपे**
9850569075
asparanj@gmail.com
Website: www.arvindparanjape.in

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org